# आशा



# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका
जानेवारी २०२४
वर्ष ४९ अंक ०१



श्रीअरविंद

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१



**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com



**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

तुम्ही एकटे नाही हे कधीही विसरू नका. 'ईश्वर' तुमच्या सोबत असून तो तुम्हाला साहाय्य करत आहे, मार्गदर्शन करत आहे. 'तो' असा सोबती आहे की जो कधीच साथसंगत सोडत नाही; 'तो' असा मित्र आहे, ज्याचे प्रेम तुम्हाला सामर्थ्यवान बनवते आणि समाधान देते. श्रद्धा बाळगा, 'तो' तुमच्यासाठी सारेकाही करेल.

– श्रीमाताजी (CWM 14 : 09)

*

# आशा

संपादकीय..........०२
कालपटावरील घटनांचे अवलोकन..........०४
श्रीमाताजीकृत प्रार्थना..........२८
वचनामृत..........३२

---

## संपादकीय

सध्या एकंदरच मानववंश एका संक्रमणशील काळामधून मार्गक्रमण करत आहे. या वाटचालीमध्ये पुष्कळ चढउतार आहेत, प्रश्न आहेत.

व्यक्तिगत, कौटुंबिक, आर्थिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय, आंतरराष्ट्रीय या सर्वच पातळ्यांवर आणि विभिन्न क्षेत्रांमध्ये व्यक्तीला या साऱ्या गोष्टींना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सामोरे जावे लागते. स्वतःच्या मर्यादित व्यक्तित्वानिशी या साऱ्या प्रश्नांना सामोरे जात असताना, व्यक्तीची दमछाक होते. कधी ती खचून जाते, कधी निराश होते, तर कधी ती हताश होते. अशा वेळी आशेचा एक किरण तिच्यामध्ये पुन्हा एक नवीन उमेद जागविणारा असतो. पण या किरणाचा मूळ स्रोतच आपल्या हाती लागला तर? तर मग निराश होण्याचे काही कारणच शिल्लक उरणार नाही. याच विचाराने, आपल्या अंतरंगामध्ये दडलेल्या या आशा-सूर्याला 'अभीप्सा' मासिकाचा हा अंक समर्पित करत आहोत.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.






**नूतन वर्षाभिनंदन !!**

| जानेवारी २०२४ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० |
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| २८ | २९ | ३० | ३१ | | | |

## जानेवारी महिन्यातील ठळक घटना

### जानेवारी १९०८

श्रीअरविंद यांची महाराष्ट्रातील एक योगी श्री. विष्णु भास्कर लेले यांच्याशी भेट झाली. 'विचार मनामध्ये प्रवेश करण्यापूर्वी त्यांना बाहेरच थोपवावे,' असे लेले यांनी श्रीअरविंदांना सांगितले आणि त्यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे साधना केल्यानंतर, अवघ्या तीन दिवसांमध्ये श्रीअरविंद यांच्या मनामध्ये संपूर्ण शांत स्थिती प्रस्थापित झाली. येथे त्यांना 'शांत ब्रह्मा'चा अनुभव आला, 'निर्वाणा'चा साक्षात्कार झाला.

*

### जानेवारी १९२२

यावर्षीपासून श्रीअरविंद नियमितपणे सायंकालीन चर्चांच्या माध्यमातून साधकांच्या शंकांचे निरसन करू लागले. या चर्चांमध्येच श्री. ए. बी. पुराणी संपादित 'Evening Talks with Sri Aurobindo' या सुप्रसिद्ध पुस्तकाचा मूळस्रोत आहे.

*

### जानेवारी १९३४

'श्रीअरविंद आश्रमा'च्या डायनिंग रूमचे उद्‌घाटन झाले.

*

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७६ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

## वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक घरपोच)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक घरपोच)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक घरपोच)
देणगीदार : ४००० रु.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

## वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

**मनिऑर्डरने वर्गणी पाठवायची असल्यास,** श्री. गोविंद पोतदार, श्रीअरविंद सोसायटी, मातोश्री आर्केड, सहकार भवन समोर, अमरावती, महाराष्ट्र – ४४४६०१ या पत्त्यावर पाठवावी. मनिऑर्डरमध्ये अभीप्सा मासिकाचा स्पष्ट उल्लेख करावा, ही विनंती.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# आशावादी विचारांचे सामर्थ्य

कूए नावाचे एक डॉक्टर होते. ते मानसिक उपचाराने, स्वयंसूचनेने लोकांचे आजार बरे करत असत. अशा रीतीने पुष्कळ लोकांचे आजार त्यांनी बरे केले होते, त्यामुळे डॉक्टर कूए विख्यात झाले होते.

त्यासंबंधी श्रीमाताजींनी एक किस्सा सांगितला होता. त्या सांगतात, माझ्याकडे एक स्त्री येत असे, तिचे केस प्रचंड प्रमाणात गळत असत. आता लवकरच तिला टक्कल पडेल अशी तिची स्थिती झाली होती. त्याच सुमारास कोणीतरी तिला डॉ. कूए यांच्या उपचारप्रणालीची माहिती दिली. तिने तो प्रयोग करायला सुरुवात केली. केस विंचरताना, ती स्वतःच्या मनाशी असा विचार करत असे की, ''माझे केस गळणार नाहीत.'' पहिल्या एक दोन वेळेला त्याचा काहीच परिणाम झाला नाही पण तिने तो प्रयोग नेटाने चालू ठेवला. प्रत्येक वेळी केस विंचरण्यापूर्वी ती निश्चयपूर्वक ''मी माझे केस आता विंचरणार आहे पण ते गळणार नाहीत.'' असा विचार करत असे. आणि खरोखरच, महिन्याभरात तिचे केस गळणे थांबले. नंतर तिने असा विचार करायला सुरुवात केली की, ''आता माझे केस वाढत आहेत.'' आणि ती त्यामध्ये कमालीची यशस्वी झाली; खरोखरच मी तिचे वाढलेले केस पाहिले.

मात्र यातील मेख एवढीच की, अशा प्रकारची विचार–रचना करत असताना, तुमच्या मनाच्या दुसऱ्या भागाने असे म्हणता कामा नये की, ''मी तसा विचार करत आहे खरा, पण त्याचा काही उपयोग होईल की नाही कोण जाणे?'' तुम्ही जर असा निराशावादी विचार केलात तर अशा विचारांनी तुम्ही तुमचे काम स्वतःच वाया घालविता.

श्रीमाताजी पुढे म्हणतात, लोक चुकीच्या पद्धतीने विचार करण्यात त्यांचा वेळ व्यर्थ घालवतात. त्यांची मानसिक क्रिया ही सर्वसामान्यतः अर्धी निराशावादी आणि अर्धी विघातक असते. त्यांनी जे काही केले आहे त्याचे कसे भयानक त्रासदायक परिणाम घडून येतील आणि कोणकोणत्या वाईट गोष्टी घडू शकतील अशा प्रकारची कल्पना करण्यामध्ये ते त्यांचा बहुतांशी वेळ घालवितात. पण त्याऐवजी त्यांनी त्यांच्या कल्पनाशक्तीचा सकारात्मक उपयोग केला असता तर साहजिकच त्यांना त्याचे चांगले परिणाम अनुभवास आले असते.

– आधारित (CWM 07 : 04-05)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### २१ फेब्रुवारी २०००

'अतिमानसा'चे अवतरण घडविण्यासाठी श्रीमाताजी देहरूपात आल्या आहेत आणि त्या 'अतिमानसा'च्या अवतरणामुळेच येथे त्यांचे संपूर्ण आविष्करण शक्य झाले आहे.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 34)

*

### २९ फेब्रुवारी २०००

नूतन जगतामध्ये आपले स्थान असावे असे ज्यांना वाटते, त्या सर्वांना प्रामाणिकपणे त्यासाठी स्वतःची तयारी करता यावी म्हणून त्यांना आम्ही त्या जगताच्या जन्माची उद्‌घोषणा करत असतानाच आमंत्रित करत आहोत.

– श्रीमाताजी (CWM 15 : 97)

*

### २४ एप्रिल २०००

तुम्ही फक्त अभीप्सा बाळगायची आहे, तुम्ही स्वतःला श्रीमाताजींप्रत खुले ठेवायचे आहे. जे त्यांच्या इच्छेच्या विरोधी असेल त्या साऱ्या गोष्टींना नकार द्यायचा आहे आणि श्रीमाताजींना तुमच्यामध्ये कार्य करू द्यायचे आहे – त्याचबरोबर तुमचे कर्मदेखील त्यांच्यासाठी करायचे आहे आणि त्यांच्या शक्तीद्वारेच तुम्ही ते कर्म करू शकता, या श्रद्धेने ते करायचे आहे. अशा प्रकारे जर तुम्ही स्वतःला खुले ठेवलेत तर कालौघात तुम्हाला ज्ञानप्राप्ती होईल आणि साक्षात्कारही होईल.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 154)

*